Marathi



# ख्रिस्त जन्माचा संदेश



## देव मानवाकडे येतो

देवाने सारी सृष्टी निर्माण केली, तसाच माणूसही निर्माण केला. मात्र माणूस त्याने स्वतःसारखा बनविला आणि पृथ्वीवर राज्य करण्याचा अधिकार त्याला दिला.

गर्वाने फुगून त्याने देवाविरुद्ध बंड पुकारले. त्यामुळे तो इतर मानवांचा द्वेष करू लागला. प्रेम, न्याय, शांती यांचा त्याला विसर पडला. द्वेष, छळवाद, झगडा यांचे साम्राज्य जगात पसरले. अशा जागतिक परिस्थितीत देव या जगात आला. त्याने मानवी अवतार धारण केला. पलेस्टाईन देशातल्या बेथलेहेम या छोटयाशा खेडयात सुमारे दोन हजार वर्षापूर्वी हा माणूस जन्माला आला. त्याला 'शब्द' असेही नांव मिळाले. कारण या पतन पावलेल्या जगाला देवाच्या अखंड प्रेमाचा संदेश तो घेऊन आला.

## येशूंचा जन्म

तो शब्द म्हणजेच येशू. एका गव्हाणीत त्यांचा जन्म झाला. त्यावेळी जनगणना चालू असल्यामुळे बेथलेहेम गावात लोकांची भयंकर गर्दी झाली होती. येशूंचे आईवडील योसेफ व मरीया यांना एका गलिच्छ ठिकाणी आश्रय घ्यावा लागला. मरीयेचे दिवस भरत आले होते. त्याच रात्री येशूंचा जन्म झाला. तुझा मुलगा मानवाच्या पापाचे क्षालन करील असे मरीयेला अगोदरच सांगण्यात आले होते. एका सामान्य स्थळी अशी ही महान घटना घडत होती. मग खुद्द देवदूतांनी याविषयी घोषणा करून मेंढपाळांना सांगितल्यास नवल काय?

त्या भागांतले काही धनगर त्या रात्री माळरानावर आपले कळप राखीत होते. तेव्हा अचानक परमेश्वराचा एक दूत त्यांच्यासमोर प्रकट

त्यांच्या कार्यामूळे जनतेचे हृदयपरिवर्तन झाले. त्यांच्या काळातील सत्ताधारी मंडळीला मात्र आपल्या सत्तेला आणि संपत्तीला धोका निर्माण झाला आहे असे दिसू लागले. सामान्य जनतेच्या या आवडत्या नेत्याविरुद्ध त्यांनी कारस्थान रचले. हे लोक राष्ट्राचे धर्मपुढारी होते. त्यांनी येशूंना राष्ट्राचा शत्रू ठरवून त्या काळच्या प्रथेप्रमाणे वधस्तंभावर लटकावून ठार मारायला तेथल्या रोमन राज्यपालाला भाग पाडले.

येशू मुळातच दैवी प्रकृतीचे होते. परंतु जबरदस्तीने देवासमान होण्याचा त्यांनी कधीही विचार केला नाही. त्यांनी स्वखुशीने सर्वस्वाचा त्याग केला आणि सेवकाची वृत्ती पत्करली. ते मानवाप्रमाणे झाले. त्यांनी मानवी प्रकृती धारण केली. ते लीन झाले. शेवटपर्यंत आज्ञापालन करीत ते मरणाला-अन् तेही वधस्तंभावरच्या मरणाला सामोरे गेले. म्हणूनच देवाने त्यांना सर्वोच्च पदास चढविले. त्यांना परमश्रेष्ठ असे नांव दिले. तेव्हा येशू या त्या नावाचा आदर राखण्यासाठी स्वर्ग, पृथ्वी आणि अधोलोक यांतला सारा प्राणिमात्र गुडघे टेकील. तसेच येशू ख्रिस्त हे प्रभू आहेत असे पुकारून देवपित्याला धन्यवाद देतील.

## आध्यात्मिक जीवन

पाप व कलंक यांपासून येशू आमची सुटका करतात. त्यांचा शिष्य व्हायचे तर पापांचा त्याग करून नवे जीवन जगायला हवे.

ख्रिस्त येशूंशी ज्यांचे ऐक्य जडले आहे अशांना आता दंडाज्ञा नाहीच. ख्रिस्त येशूंशी जडलेल्या ऐक्यामुळे जे जीवन आपल्याला लाभते ते आत्म्याच्या गुण धर्मामुळे होय. त्यामुळे पाप व मरण यांच्या बंधनातून आपण मुक्त झालो आहोत. माणूस स्वभावतः च दुर्बल असल्याने जे धर्मशास्त्राला करता आले नाही ते देवाने केले. त्याने आपला पुत्र पाठविला.

करण्यासाठी आले आहेत, असे ते शिकवीत. पॅलेस्टाईन देशावर त्या काळी परक्यांचे म्हणजे रोमचे राज्य होते. देशातले राष्ट्रीय पुढारी म्हणजे पुरोहित व सरदार हे वर्ग न्यायाचा व सत्याचा विपर्यास करून पैसा कमविण्यात आणि अधिकार बळकवण्यात गुंतले होते.

मग ते नासरेथ येथे गेले. तेथेच ते लहानाचे मोठे झाले होते. शब्बाथवारी(म्हणजे शनिवारी) ते नेमाप्रमाणे देवालयात गेले. शास्त्रपठणाकरता ते उभे राहिले, तेव्हा त्यांच्या हातात संदेशहर यशया याचा ग्रंथपट देण्यात आला. त्यांनी ग्रंथपट उलगडला तेव्हा त्यात पुढे दिल्याप्रमाणे लिहिलेले त्यांना आढळले.

"परमेश्वराचा आत्मा माझ्याठायी संचरला आहे.
दीनजनांना शुभसंदेश द्यावा म्हणून त्याने मला अभिषेक केला आहे.
बंदीजनांना स्वातंत्र्य जाहीर करावे आणि
अंधळ्याना दृष्टिलाभ व्हावा;
रंजल्यागांजलेल्यांची मुक्तता व्हावी,

आणि परमेश्वराचा कृपाप्रसाद होण्याचा समय जाहीर करावा म्हणून मला पाठवलंय!"

## येशू नम्र झाले

येशू केवल बोलत नसत. एखाद्याला माणसाची मदत मिळणे अशक्य झाले की येशू मदतीला धावून येत व बरे करण्याचे अलौकिक चमत्कार करीत. अशा रीतीने देव या जगात कार्य करीत असून आपला सांभाळ करीत आहे आणि आपल्याला पावन करीत आहे असे येशूंनी दाखवून दिले. पण हे सारे करायला त्यांनी एक नवीनच तंत्र अंवलंबिले होते. एखाद्या नोकराप्रमाणे सेवा करून त्यांनी कार्य केले.

झाला आणि परमेश्वराचे तेज त्यांच्या सभोवार झळकू लागले, त्यामुळे ते फार घाबरले तेव्हा तो दूत त्यांना म्हणाला, "भिऊ नका. साऱ्या जनतेला अत्यंत आनंददायक अशी खूषखबर मी तुमच्याकरता आणली आहे. आजच दावीदाच्या नगरात तुमचा मुक्तिदाता प्रभू ख्रिस्त जन्मला आहे. त्याला ओळखण्याची खूण म्हणजे कपड्यात गुंडाळून गोठ्यात ठेवलेलं एक बाळ तुम्हांला आढळेल."

मग एकाएकी स्वर्गीय दूतांचा एक समुदाय त्या दूताभोवती प्रकट झाला आणि देवाचे गुणगौरव करीत ते सारे गाऊ लागले,

"परमोच्च स्वर्गात देवाचे गुणगौरव होवो.
अणि त्याच्या प्रियजनांना पृथ्वीवर शांती लाभो."

नंतर ते दूत तेथून निघून स्वर्गात गेले; तेव्हा ते धनगर एकमेकांना म्हणू लागले, "चला, आपण बेथलेहेमास जाऊ आणि परमेश्वरानं सांगितल्याप्रमाणं घडलेली ही घटना पाहू या!"

ते घाईघाईने तिकडे गेले, तेव्हा त्यांना गोठ्यात ठेवलेले बाळ, मरीया व योसेफ ही आढळली. हे पाहिल्यानंतर, त्याना त्या बाळाविषयी जे सांगण्यात आले होते ते त्यांनी सर्वांना निवेदन केले. धनगरांचे बोलणे ऐकून सगळ्यांना नवल वाटले. मरीयेने मात्र या सर्व गोष्टी मनात ठेवल्या व त्यांवर ती विचार करू लागली. धनगरांनी जे ऐकले व पाहिले होते ते सर्व त्यांना सांगितल्याप्रमाणेच घडले होते, म्हणून देवाचा महिमा वर्णीत व गुणगान गात ते माघारी गेले.

## येशू मुक्तिदाता

येशूनी आपल्या कार्याला आरंभ केला तेव्हा ते तीस वर्षांचे होते. आपल्या सर्वांच्या जीवनाचा सत्ताधीश व स्वामी देव आहे आणि स्वतः येशु न्याया व प्रेम यांवर आधारलेले असे देवाचे राज्य स्थापन

पापाचे निर्मूलन करण्यासाठी तो मानवाची पापी प्रकृती धारण करून आला. अशा रीतीने देवाने मानवी प्रकृतीतल्या पापाला दंडाज्ञा ठरविली. आपण जे मानवी प्रकृतीस अनुसरून जगतो त्या आपण धर्मशास्त्राला अनुसरून जगावे म्हणून देवाने असे केले.

## येशूंकरवी देवाचे प्रेम

ख्रिस्त येशू आपल्याकरिता देवाजवळ मध्यस्थी करीत आहेत ख्रिस्तप्रेमापासून आपल्याला काय दूर लोटील? त्रास, कष्ट, छळ, उपासमार, दारिद्र्य, संकट की मृत्यू?

काहीच नाही. ज्या येशूंनी आमच्यावर प्रेम केले त्यांच्या करवी आम्ही या सर्वांवर मात करतो. येशू ख्रिस्त, आमचे प्रभु यांच्याकरवी देवाने आमच्यावर प्रेम केले. त्या प्रेमपासून या जगातले काहीही आम्हांला दूर लोटू शकत नाही.

देवाच्या एकुलत्या पुत्रावर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येकाला अनंत जीवन लाभावे म्हणून देवाने त्याला पाठविले. देवाने जगावर एवढे प्रेम केले. देवाने आपला पुत्र या जगात पाठवीला, तो जगाचा न्यायदाता म्हणून नव्हे-मुक्तिदाता म्हणून!

(लूक २: ८-२०, ४: १६-१९, फिलिप्पैकरांस पत्र २:६-११, रोमकरांस पत्र ८: ३४-३९, योहान ३: १६-१७)

THE BIBLE SOCIETY OF INDIA
BOMBAY AUXILIARY
MALHOTRA HOUSE
OPP. G.P.O.
P.O. BOX 1453
BOMBAY - 400 001

*Published by:* **THE BIBLE SOCIETY OF INDIA**
*MESSAGE OF CHRISTMAS* - Marathi
50P 0818/99-2000/20M ISBN 81-221-1614-0

Printed at :- Shakthi Prints & Products, Bangalore-33.